# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.1335@gmail.com  दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०२१/1626  दि.२८.०७.२०२१

प्रति,

**प्राचार्य / संस्था प्रमुख,**

सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषय: केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी व KYC करणेबाबत सन 2021-22 करीता..**

संदर्भ: मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य.2020-21/डीबीटी/8409, दि.26.07.2021

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या एन.एस.पी. पोर्टलव्दारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत 1. केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना, 2. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, 3. अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनांची सविस्तर माहिती मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

NSP पोर्टलव्दारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे तसेच सन 2021-22 पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीनमध्ये आधार व मोबाईल क्रमांक नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन 2021-22 साठी नवीन महाविद्यालय / संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रिया NSP Portal च्या Home Page वरील Service Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (सोबत प्रक्रिया करण्याबाबतची प्रत जोडण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer व्दारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करुन त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

NSP Portal व्दारे ज्या शिष्यवृत्ती लाभार्थीचे आधार कार्ड, मोबाईल नंबर प्रमाणित केलेले आहेत व त्यांचे वय 18 वर्षांच्या वर आहे अशा सर्व (Fresh & Renewal) लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळेल. तरी सदर विषयाचे गांभिर्य विचारात घेऊन उपरोक्त सूचनेप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावी.

Student N.B
30/7/21

(श्री मोहन मोहिते)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत:

मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.